शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०१/२०२४

| | |
|---|---|
| श्री.रमेश ईश्वर जाधव<br>मु.पो.भिलवडी स्टेशन, ता.पलूस, जि.सांगली. | तक्रार अर्जदार |

विरूध्द्

| | |
|---|---|
| १. भारती विद्यापीठ, भारती विद्यापीठ भवन, लाल बहादूरशास्त्री मार्ग, पुणे ४११०३०<br>२. भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर | वि.प. |

भारती विद्यापीठ, भारती विद्यापीठ भवन, पुणे या शिक्षण संस्थेचे भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर यांचेकडील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. रमेश ईश्वर जाधव यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०९/०२/२०२४ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

१. तक्रारदारांचे थोडक्यात म्हणणे असे की, दि. २९/०४/२०११ रोजीच्या आदेशाने भारती विद्यापीठाच्या अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर येथे कनिष्ठ लिपिक म्हणून रूजू झाला. त्या आधी तो भारती विद्यापीठाचे नवी मुंबई येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात दि. २०/०१/२००५ पासून कनिष्ठ लिपिक म्हणून नियुक्त होवून कार्यरत होता. तथापि दि. १९/०४/२०१९ पासून त्यास नोकरीच्या ठिकाणी कामावर येण्याकरिता बेकायदेशीरपणे प्रतिबंध केला गेला व कामावर रूजू करून घेतले नाही दि.०७/०८/२०२० पासून संस्थेत प्रवेश नाकारला. त्याला ४५ टक्के अपंगत्व असून दोन्ही हाताने तो जन्मापासून दिव्यांग आहे आणि तस प्रमाणपत्र संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांने दि.०९/०३/२०२० रोजी दिलेले आहे. संस्थेने त्याला शेवटचा पगार दि. ०९/०३/२०२० रोजी दिलेला असून त्याला काम करू दिलेले नाही आणि पगार दिलेला नाही. तो आजही सेवेत कायम आहे. आणि अशा रितीने त्याच्यावर अत्याचार केला जात आहे.

२. जाब देणार संस्थेतर्फे तक्रारदाराचे सर्व आरोप अमान्य करण्यात आलेले असून जाब देणार यांचे म्हणणेनुसार मुंबईवरून बदलीने कोल्हापूर येथे दि. २९/०४/२०११ रोजी रूजू झाले. आधीच्या

ठिकाणी ईबीसी स्कॉलरशिपचे ते काम पाहत असलेने कोल्हापूर येथे देखील त्यांना तेच काम देण्यात आले. तथापि त्यांचेकडून ईबीसी स्कॉलरशिप, रोजकीर्द आणि त्यावरील व्यवहारांच्या तपशीलाबाबत अनियमितता दिसून येत असल्याकारणाने महाविद्यालयीन तसेच प्रशासकीय पातळीवरून त्यांना वेळोवेळी प्रलंबित कामे पूर्ण करण्यास सांगण्यात आलेले होते. तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मान्यताप्राप्त विद्यार्थ्यांची यादी व ईबीसी स्कॉलरशिप यादी जुळवून घेण्यास तक्रारदारांना सांगण्यात आलेले असताना अद्यापही तक्रारदारांना त्या याद्या जुळवता आलेल्या नाहीत. त्या कारणाने तक्रारदार स्वतः महाविद्यालयात येणे बंद झाले. त्यांना कुणीही बेकायदेशीरपणे प्रतिबंध केला नाही किंवा कामावर रूजू करून घेणार नाही असे कोणी म्हटलेले नाही. प्रलंबित कामे पूर्ण करून दि.०१/०२/२०२० पर्यत त्याचा अहवाला सादर करण्यास तक्रारदारांना नोटीस दिलेली होती पण अजूनही त्यांचेकडील व्यवहाराच्या तपशीलाबाबत अनियमितता आहे आणि कामे प्रलंबित आहेत. त्यासंबंधी तक्रारदारांकडे विचारणा करण्यात आल्याने ते स्वतः महाविद्यालयात येण्याचे टाळू लागले व त्यांनी येणे बंद केलेले आहे. त्यासंबंधीचा थंब रिपोर्ट या प्रकरणात दाखल केला आहे तसेच तक्रारदारांनी सादर केलेल्या अपंगत्वाच्या प्रमाणपत्रा आधारे टायपिंग परीक्षा आणि संगणकाची शासकीय परीक्षा (एमएससीआयटी) उत्तीर्ण होण्याची अट भारती विद्यापीठ पुणे यांचेकडून माफ करण्यात आली असून वार्षिक वेतन वाढीबाबत नियमात शिथिल आणून त्यांना वार्षिक वेतनवाढ प्रत्येक वर्षी देण्यात आलेली आहे. त्यांना शेवटचा पगार मार्च २०१९ मध्ये दिलेला आहे त्यानंतर ते महिन्यातून दोन चार वेळाच कामावरती येत असत. काम करून पगार त्यांना दिलेला नाही हा तक्रारदारांचा आरोप खोटा आहे. तक्रारदारांनी रजा अर्जाची पूर्तता न केल्याने त्यास नियमानुसार वेतन अदा केलेले नाही. तक्रारदारांकडे जे ईबीसी स्कॉलरशिपचे काम होते त्याबाबत विशेष तपासणी पथक नेमण्यात आले व त्यापथकाच्या दि.२९/०८/२०१७ च्या अहवालानुसार तदर्थ अनुदान शिल्लक असल्याचे नमूद करण्यात आले व त्याची रक्कम रू.३४,३६,९४०/- इतकी असून ती समाजकल्याण अधिकारी, कोल्हापूर यांचे माध्यमातून मे, २०२० मध्ये सरकारी खजिन्यात वर्ग करण्यात आलेली आहे. तक्रारदारांच्या कामात हा हलगर्जीपणा झालेला असून त्याचे आर्थिक नुकसान महाविद्यालयास भोगावे लागले आहे. पथकाच्या अहवालानुसार ज्या विद्यार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रू.४,५०,०००/- पेक्षा जास्त असूनही आणि त्यांना स्कॉलरशिप मंजुर होत नसली तरीही अशा विद्यार्थ्यांचे स्कॉलरशिप अर्ज तक्रारदाराने शासनास सादर केलेले आहे आणि त्यात तक्रारदारांना दोषी धरले आहे. सदरची रक्कम रू.१४,१७,१६५/- इतकी होत असून ती रक्कम सहायक आयुक्त, समाजकल्याण कोल्हापूर यांनी महाविद्यालयास शासन दरबारी जमा करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यामुळे तक्रारदारांमुळे

महाविद्यालयास आर्थिक नुकसान झालेले आहे. तक्रारदार हे स्वतःहून कामावर महाविद्यालयात येण्यास बंद झालेने असून ते कामावर हजर नसल्याकारणाने त्यांना नियमानुसार पगार देण्यात प्रश्नच येत नाही सबब प्रस्तुतची तक्रार खोटी असल्याचे दिसून येते म्हणून ती दप्तरी दाखल करून त्याबाबत तक्रारदारांना लेखी समज द्यावी असे जाबदारांनी म्हणणे मांडलेले आहे

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तुतचे प्रकरण समितीसमोर सुनावणीकरिता आले असता, तक्रारदाराने ही बाब मान्य केली की त्यांचे कालावधीतील स्कॉलरशिप संबंधीचे काम प्रलंबित राहिलेले असून ते अद्याप पूर्ण झालेले नाही. मागील सुनावणीस ही बाब समितीच्या नजरेस आल्यानंतर समितीने तक्रारदारास दोन महिन्यांचा कालावधी देवून प्रलंबित काम पूर्ण करून देण्याचा तोंडी आदेश दिलेला होता. त्यानंतर आज हे प्रकरण सुनावणीसाठी घेतले असता तक्रारदारांनी स्वतः हजर होवून या कालावधीत महाविद्यालयाकडून बोलवणे आले नसल्यामुळे ते महाविद्यालयात गेले नाहीत आणि म्हणून प्रलंबित काम पूर्ण झालेले नाही असे म्हणणे या समितीसमोर मांडलेले आहे. दि.२५/०६/२०२४ रोजी तक्रारदाराने शपथपत्र दाखल करून त्यात आपल्या तक्रारअर्जातील मजकूराचा पुर्नउच्चार केलेला आहे. तथापि त्या शपथपत्रात तक्रारदाराने दरम्यानचे काळात महाविद्यालयाकडून बोलावणे आले नसल्याने ते काम करण्यास महाविद्यालयात गेले नाहीत आणि काम पूर्ण करू शकले नाहीत, असे म्हणणे मांडलेले नाही.

जाबदारांतर्फे डॉ. विजय घोरपडे प्राचार्य, भारती विद्यापीठ, अभियांत्रिकी महाविद्यालय, कोल्हापूर हे हजर असून त्यांनी जाबदारांच्या कथनानुसार समितीसमोर आपले निवेदन केले आहे त्यांचे निवेदनानुसार ठळकपणे शाबित होणाऱ्या गोष्टी की, तक्रारदार हा जाबदार संस्थेचा कायमस्वरूपी नेमलेला कर्मचारी असून त्याची सेवा विहित विधीप्रमाणे आजपर्यंत संपुष्टात आणलेली नाही. डॉ. घोरपडे यांचे निवेदनानुसार तक्रारदार जर महाविद्यालयात येवून प्रलंबित काम पूर्ण करून देत असेल तर त्यास महाविद्यालयाची हरकत नाही. तथापि महाविद्यालयास, तक्रारदारांच्या कृत्यामुळे झालेले आर्थिक नुकसान भरून देण्याबाबत तक्रारदारांना आदेश व्हावेत असे म्हणणे जाबदारांतर्फे मांडण्यात आले.

तक्रारदारांनी आजरोजी या समितीसमोर तो जाबदार संस्थेमध्ये दि.०९/०७/२०२४, आजरोजी, हजर होत असून महाविद्यालयातील प्रलंबित काम करण्यास तयार आहे आणि एका महिन्याच्या आत ते प्रलंबित काम पूर्ण करून देत आहे. त्यामुळे त्याला पुढे नियमित करून घ्यावे असे लेखी निवेदन या समितीसमोर दिलेले आहे. त्यावर संस्थेतर्फे डॉ. विजय घोरपडे यांनी असे निवेदन केले की,

तक्रारदाराला दि. १५/०७/२०२४ पासून कामावर हजर करून घेत असून जाधव यांचेकडून कामात झालेला हलगर्जीपणा आणि अनियमितता यासंदर्भात योग्य त्या चौकशी समितीकडून चौकशी करण्याचा अधिकार जाबदार अबाधित राखत आहेत. तसेच त्यांच्या गैरहजर हजेरीच्या काळातील वेतन अदा न करण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत आणि त्याचप्रमाणे तक्रारदारांकडून काही आर्थिक नुकसान झाल्यास ते एक रक्कमी वसूल करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

या प्रकरणात एक गोष्ट सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट होते की, तक्रारदाराची सेवा अद्यापही चालू आहे आणि ती नियमानुसार संपुष्टात आणली गेलेली नाही. तक्रारदाराला जाबदार महाविद्यालय आजही कामावर रूजू करून घेण्यास तयार आहे. तक्रारदाराकडून काही कामे प्रलंबित राहिली आहेत ही बाब स्वतः तक्रारदाराने मान्य केलेली आहे. तर ही प्रलंबित कामे एका महिन्याच्या आत पूर्ण करून देण्याचे आश्वासन या लेखी निवेदनात तक्रारदारांनी समितीसमोर ठेवलेले आहे. मार्च २०१९ पासून आजतागायत तक्रारदार जाबदार महाविद्यालयामध्ये गैरहजर आहेत ही बाब दिसून येते. तक्रारदाराचे म्हणणे की त्यास बायोमेट्रीक साधनावर थंब इंम्प्रेशन देण्यास प्रतिबंध केला होता ही बाब संयुक्तिक आणि स्वाभाविक वाटत नाही. त्याबाबतीत तक्रारदारांनी कसलाही पुरावा या प्रकरणात आणलेला नाही. यावरून ही गोष्ट स्पष्ट दिसते की, सदर काळात तक्रारदार सेवेवर हजर नव्हता. त्याचे असे ही म्हणणे नाही की त्याची गैरहजेरी ही रजा म्हणून गृहित धरलेली आहे. त्यामुळे सदर कालावधीचे वेतन आणि इतर देय रक्कम मिळण्यास तक्रारदाराला मिळण्यास तो पात्र असल्यास प्रश्नच उद्‌भवत नाही. या सर्व बाबींचा विचार करून आणि या प्रकरणातील मान्य असलेल्या तथ्यांवरून खालील आदेश पारीत करणे सुसंगत होईल असे या समितीचे मत आहे. सबब खालील न्यायाच्या दृष्टीने आदेश पारीत करीत आहोत.

## आदेश

१. सदरची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जाबदारांनी तक्रारदारास दि.१५/०७/२०२४ पासून कामावर रूजू करून घ्यावे.

३. तक्रारदारांनी दि. १५/०७/२०२४ पासून एका महिन्याच्या आतमध्ये त्यांचेकडे असलेले प्रलंबित काम पूर्ण करून द्यावे आणि तसा अहवाल महाविद्यालयास सादर करावा. सदर कामात तक्रारदारांची हलगर्जी झालेली असल्यास किंवा विशेष तपासणीच्या पथकाच्या अहवालावरून, तक्रारदारांवर खातेनिहाय

चौकशी करून त्या त्रुटींबाबत तक्रारदारांना दोषी धरून त्यांचेविरूध्द् योग्य ती कार्यवाही करण्याचा जाबदारांचा अधिकार याद्वारे अबाधित ठेवण्यात येतो. तक्रारदारांकडून, जर काही नुकसानभरपाई येणे असेल तर, ती वसूल करून घेण्याचा जाबदार हयांचा अधिकार अबाधित ठेवण्यात येतो. जाबदारांच्या नुकसान भरपाईच्या मागणी बाबत ही समिती आपल्या सिमीत कार्यक्षेत्रामुळे काही आदेश पारित करू शकत नाही. तक्रार निकाली काढण्यात येते.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 18 JUL 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)